# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२२

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### घाटकोपरमधील असल्फा विभागातील खोल गटारात पडून महिलेचा मृत्यू झाल्याबाबत

**(१) ५७४९ (१३-१२-२०२०) श्री.सुजितसिंह ठाकूर, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटकोपरमधील असल्फा विभागात शनिवार, दिनांक ३ ऑक्टोबर, २०२० रोजी झालेल्या मुसळधार पावसात चार फूट खोल गटारात पडून शीतल जितेश भानुशाली या वाहून गेल्याची शक्यता वर्तवली जात होती, अखेर या महिलेचा मृतदेह हाजीअली समुद्रकिनारी रविवार, दिनांक ४ ऑक्टोबर, २०२० रोजी रात्री ११ वाजता ताडदेव पोलिसांना आढळून आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी अतिरिक्त पोलीस आयुक्तांनी चौकशी करुन १५ दिवसात अहवाल प्राप्त झाल्यानंतर दोषींवर कारवाई करण्यात येईल अशी माहिती महापौर किशोरी पेडणेकर यांनी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, सदर चौकशी अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, चौकशी अहवालानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (२९-०६-२०२२) :** (१) होय, दिनाक ०३/१०/२०२० रोजी शितल जितेश भानुशाली हि महिला आपल्या राहत्या घरातून बेपत्ता झाली असून सदर महिलेचा मृतदेह दिनांक ०४/१०/२०२० रोजी हाजीअली समुद्र किनारी आढळून आला आहे. सदर प्रकरणाची ताडदेव पोलीस ठाणे येथे अपमृत्यू नोंद क्र. ४३/२०० कलम १७४ फौ.प्र.द.सं. अन्वये नोंद घेण्यात आली आहे.

(२) सदर प्रकरणी महापौर किशोरी पेडणेकर यांच्या कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार तसेच निर्देश पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या कार्यालयास प्राप्त झालेले नाहीत.

(३) सदर प्ररकणी घाटकोपर पोलीस ठाणेकडून चौकशी करण्यात आली असून चौकशीमध्ये अज्ञात इसम / समाज कंटकाने शिवाजीनगर, असल्फा मेट्रोजवळ, घाटकोपर पश्चिम या उंचसखल व दाट लोकवस्ती असलेल्या झोपडपट्टीमधील प्रजन्य जलाचा निचरा होण्यासाठी असलेल्या प्रजन्यवाहिनीमध्ये हस्तक्षेप करुन खोडसाळ व अप्रामाणिक हेतूची कृती करुन महिलेच्या मृत्यूस कारणीभूत झाला असावा म्हणून अज्ञात इसमाविरुध्द महानगरपालिकेच्या दुय्यम अभियंता, स्थापत्य श्री.नितिन रत्नाकर पावडे, यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक ०३/११/२०२० रोजी गु.र.क्र.७६९/२०२० कलम ३०४ (अ), २६८, ४२५ भा.दं.वि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोकणातील शेतकऱ्यांना आंबा फळ पीक विमा योजनेचा लाभ देण्याबाबत

**(२) ६४३० (१६-०३-२०२१) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अवेळी पाऊस आणि तापमान या निकषात कृषी विभागाने आंबा फळ पीक विमा योजनेसंदर्भात नव्याने बदल केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निकष बदलण्याबाबत तसेच फळ पीक विम्याच्या अडचणीबाबत भावई शेतकरी मंडळ झाराप (ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग) यांनी

दिनांक १२ डिसेंबर, २०२० रोजी आयुक्त कृषी, पुणे यांचेकडे पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निकषाचे स्वरुप काय आहे, नव्याने बदल केलेल्या सुधारणेनुसार कोकणातील शेतकऱ्यांना विम्याचा लाभ मिळणार नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी पसरली आहे, उक्त शासन निर्णय तीन वर्षाकरीता लागू राहणार असल्याने हापूस उत्पादकांना विम्याच्या लाभापासून वंचित रहावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) अल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उपरोक्त शासन निर्णयाबाबत फेरविचार करुन कोकणातील शेतकऱ्यांना आंबा फळ पीक विमा योजनेचा लाभ मिळण्याचे दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२९-०६-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

पाऊस, तापमान, सापेक्ष आर्द्रता, गारपीट व वेगाचे वारे या हवामान धोके संदर्भात चर्चा करण्यासाठी आयुक्त, कृषी यांचे अध्क्षतेखाली राज्यस्तरीय तांत्रिक समितीची बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये कृषी विद्यापिठातील शास्त्रज्ञ तसेच राष्ट्रीय फळ संशोधन केंद्र येथील शास्त्रज्ञ यांचेशी चर्चा करुन डाळिंब, पेरु, केळी, आंबा व संत्रा या फळपिकांमध्ये फळांचे नुकसान होते त्या हवामान धोक्याची पातळी ठरवून त्यांचा समावेश सन २०२०-२१ पासून करण्यात आला आहे. त्यानुसार, आंबा या फळपिकासाठी अवेळी पाऊस, कमी तापमान, जास्त तापमान व गारपीट हे हवामान धोके लागू करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र-गुजरात सीमा स्पष्ट करून महाराष्ट्राची जमीन ताब्यात ठेवण्याबाबत

**(३) ७१९५ (१६-०३-२०२१) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र व गुजरात राज्याच्या सीमेवरील महाराष्ट्र राज्याच्या हद्दीतील वेवजी ग्रामपंचायत हद्दीत गुजरात राज्यातील सोलसुंभा ग्रामपंचायतीने विजेचे खांब उभारुन अतिक्रमण केले असल्याचे दिनांक २८ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र राज्याच्या ग्रामपंचायत हद्दीतील विजेचे खांब काढून टाकण्याबाबत वेवजी (महाराष्ट्र) ग्रामपंचायतीने वारंवार कळवून देखील सोलसुंभा (गुजरात राज्य) ग्रामपंचायतीने आजतागायत विजेचे पोल न काढता अतिक्रमण कायम ठेवले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, "दोन्ही राज्यांच्या भूमि अभिलेख, नकाशे, महसूल खाते परवानगीने सिमेची हद्द निश्चित करावी लागेल त्यासाठी वेवजी (महाराष्ट्र) व सोलसुंभा (गुजरात) या दोन्ही सीमेवरील नकाशे मागवून त्याचा तोडगा काढावा लागेल" असे उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम, तलासरी यांनी सांगितले असल्याचेही त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महाराष्ट्र-गुजरात सीमा स्पष्ट करून महाराष्ट्राची जमीन ताब्यात ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (२९-०६-२०२२) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम १३३ अन्वये मौजे वेवजी, ता.तलासरी, जि.पालघर (महाराष्ट्र) व मौजे सोलसुंभा, ता.उंबरगांव, जि.वलसाड (गुजरात) येथील महाराष्ट्र व गुजरात राज्याची सीमा हद्द

निश्चित करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी, पालघर व भूमि अभिलेख विभागाकडून सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पनवेल महापालिकेतील महसुली गावांच्या गावठाणाचे सर्वेक्षण करुन मालकी हक्क देण्याबाबत

**(४) ७२२६ (१६-०३-२०२१) श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल महापालिकेतील २४ महसुली गावांच्या गावठाणाचे सर्वेक्षण करण्यास शासनाने परवानगी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, २४ महसुली गावांचे अद्यापी हद्दी निश्चित न झाल्याने घरांचे व घरांसमोरील जागांचे मालकी हक्क नसल्याने या गावातील नागरिकांना बांधकाम परवानगी मिळविण्याकरीता खूप अडचणी निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गावठाणाची जागा नावावर नसल्याने अनधिकृत बांधकाम करण्याचे प्रमाण दिवसागणिक वाढत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पनवेल महापालिकेतील २४ महसुली गावांच्या गावठाणाचे सर्वेक्षण करुन अनधिकृत बांधकाम व नागरिकांना मालकी हक्क मिळवून देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (२९-०६-२०२२) :** (१), (२), (३) व (४) दिनांक ०१/०१/२०२१ च्या शासन निर्णयान्वये पनवेल महानगरपालिका हद्दीतील मौजे देविचापाडा, चाळ, घेट, कळंबोळी, रोडपाली, पघडे, पालेखुर्द, धोगड्याचापाडा, टेंभोडे, बिड, आडीवली, रोहींजण, नागजरी, तळोजे मजकूर, खिडूकपाडा, वळवली, असूड गांव, धानसर, धरणगाव, धरणा कॅम्प, पिसारर्वे, तुर्भे, करवले व कोयनावेळे या २४ महसूली गावामध्ये गावठाण क्षेत्राचे मोजणी करणे व नगर भूमापन क्रमांक देऊन भूखंडाचा नकाशा व मालकी हक्क दस्ताऐवज तयार करणास शासन मान्यता देण्यात आली आहे.

त्यासअनुसरून जिल्हाधिकारी, रायगड यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम १२२ व कलम १२६ अन्वये सदर गावांचे नगर भूमापन करण्याबाबत दिनांक ०४/०२/२०२१ रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे.

उप अधीक्षक, भूमी अभिलेख, पनवेल यांच्याकडून पनवेल महानगरपालिका हद्दीतील गावांचे नगर भूमापनाचे काम प्रगतीत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात प्रधानमंत्री किसान योजनेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(५) ७२२८ (१६-०३-२०२१) श्री.विनायक मेटे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्रधानमंत्री किसान योजनेचा लाभ मिळण्याकरीता गरीब शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्र देवून त्याची पडताळणी न झाल्यामुळे गरीब शेतकरी सदर योजनेच्या लाभापासून वंचित राहिले असून या योजनेचा लाभ राज्यातील दोन लाख वीस हजार लाभार्थी अपात्र असतानाही त्यांचे खात्यात रुपये २५० कोटी अनुदान वर्ग केल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रशासनाच्या गैरकारभारामुळे बोगस लाभार्थ्यांनी शासनाच्या अनुदानाचा अपहार केल्याप्रकरणी सदरहू अनुदान परत वसूल करण्याबाबतची मागणी शासनाकडे करण्यात आली आहे, आतापर्यंत अनुदानापोटी वितरित केलेली किती रक्कम वसूल करण्यात आली आहे,
(३) असल्यास, या योजनेच्या लाभाकरीता आवश्यक कागदपत्रांची अचूक पडताळणी महसूल विभागाने केली नसल्याची तक्रार मराठवाड्यातील कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त योजनेचा निधी बोगस लाभार्थ्यांच्या नावे वितरित करणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करुन वितरित केलेला अनुदानाची रक्कम वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२९-०६-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाने दिनांक ०१ डिसेंबर, २०१८ पासून प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना शेतकऱ्यांना निश्चित उत्पन्न मिळण्याकरीता सुरु केलेली आहे. नोंदणी केलेल्या लाभार्थ्यांपैकी निकषांप्रमाणे पात्र शेतकऱ्यांना लाभ मिळालेला आहे. दिनांक २४ मार्च २०२१ अखेर राज्यात एकूण १०५.२५ लाख पात्र लाभार्थ्यांना रक्कम रुपये ११६६५.६० कोटी लाभ अदा झाली आहे. आयकर भरणाऱ्या व इतर कारणांमुळे अपात्र लाभार्थी अनुक्रमे एकूण २.२० लाख व एकूण २.२४ लाख अशा एकूण ४.४४ लाख अपात्र लाभार्थ्यांना जमा झालेली लाभ रक्कम रुपये ३०३.०८ कोटीचा परतावा वसुलपात्र आहे.

(२) केंद्र शासनाने लाभार्थी पात्र ठरविण्याच्या निकषांप्रमाणे आयकर भरणारे लाभार्थी व इतर कारणांमुळे अपात्र ठरलेले लाभार्थी यांना अदा झालेला लाभाच्या रक्कमेचा परतावा केंद्र शासनास जमा करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्या नुसार राज्यात केंद्र शासनास जमा करावयाच्या परतावा रक्कम रुपये ३०३.०८ कोटी पैकी दिनांक ०१/०४/२०२१ अखेर एकूण ७९.७८ कोटी रकमेचा परतावा जमा झालेला असून उर्वरीत अपात्र लाभार्थ्यांचा परतावा जमा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्र-तेलंगणा सीमेवरील गावे राज्यात समाविष्ट करुन घेण्याबाबत

**(६) ८०३४ (१६-०३-२०२१) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिवती (जि.चंद्रपूर) तालुक्यात महाराष्ट्र-तेलंगणा सीमेवरील वादग्रस्त साडेबारा गावांमध्ये परमडोली, तांडा, कोटा, मुकादमगुडा, महाराजगुडा, इंदिरानगर, अंतापूर, शंकरलोधी, पद्मावती, पळसगुड, भोलापठार, येसापूर, लेंडीगुडा आणि लेंडीजाळा इ. १४ गावांचा समावेश असून यापैकी महाराजगुडा हे अर्धे गाव महाराष्ट्रात राज्यात तर अर्धे गाव तेलगंणा राज्यात आहे, सदरहू

गावातील बोलीभाषा मराठी असून गत अनेक वर्षापासून या गावाकडे राज्य शासनाचे दुर्लक्ष झाल्याने सदरहू गावे तेलंगणा राज्यात घेण्याकरीता तेलंगणा राज्य प्रयत्न करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्याच्या सीमेवरील वादग्रस्त साडेबारा गावांचा प्रश्न सोडविण्यासाठी विशेष बैठक बोलविण्यात येईल, असे आश्वासन मा.मुख्यमंत्री यांनी माहे डिसेंबर, २०१९ मध्ये नागपूर अधिवेशना दरम्यान चंद्रपूर जिल्ह्यातील आमदारांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीमध्ये दिली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कर्नाटक राज्यामध्ये गेलेली सीमा भागातील सर्व मराठी भाषिक गावे सामील करुन संयुक्त महाराष्ट्राची स्थापना करण्याची मागणी होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिवती (जि.चंद्रपूर) तालुक्यात महाराष्ट्र-तेलंगणा सीमेवरील वादग्रस्त साडेबारा गावे राज्यात समाविष्ट करुन घेण्याबाबत शासनाचे धोरण काय आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (२९-०६-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) महाराष्ट्र-तेलंगणा सीमेवरील वादग्रस्त गावांचे भूमापन झालेले नसल्यामुळे सदर गावांचे भूमापन करण्यासाठी जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी शासनास प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्तावामध्ये असलेल्या त्रुटींची पुर्तता जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून प्राप्त झाल्यानंतर भूमापनाची पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

___________

## नागपूर जिल्ह्यातील मोटार वाहन विभागातील गैरव्यवहाराबाबत

**(७) ८६०२ (२०-०७-२०२१) श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, डॉ.परिणय फुके, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील केळवद, खुरसापार, तांदळी, देवरी या आंतरराज्य चेक पोस्टमधून सुरु असलेल्या व्यापारी वाहतूक वाहनांच्या कागदपत्रांची पूर्तता होत असतानाही आरटीओ अधिकाऱ्यांकडून जाणून-बुजून पैशांची वसुली केली जात असल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, उक्त ठिकाणी वाळू तस्करांकडून हप्ते वसुलीचे प्रकार अनेक वेळा निदर्शनास आले असून राज्याच्या परिवहन विभागातील अधिकाऱ्यांच्या बदल्यांमध्ये उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी दीडशे कोटींचा गैरव्यवहार केल्याचा आरोप वाहन विभाग संघटनेने केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू गैरव्यवहारामध्ये प्रादेशिक अधिकाऱ्याचे नाव अनेकदा समोर आल्याने नागपूर येथील लोकप्रतिनिधींनी शासनास योग्य चौकशी करण्यास संबंधितास निवेदनाद्वारे लेखी तक्रारी केल्या तसेच नागपूर विभागातील गैरकारभाराबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग व मुख्य सचिव यांना पत्र पाठवूनही अद्याप अधिकाऱ्यांची चौकशी होण्यास विलंब लावला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच याबाबत संबंधित अधिकाऱ्यांची उच्चस्तरीय समितीद्वारे चौकशी करण्यात येणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (२९-०६-२०२२) :** (१) नाही.

(२) याबाबत अज्ञात व्यक्तीने साधारणपणे मार्च-२०२१ च्या सुरुवातीला वैयक्तीक आकसापोटी खोटे, भडक, कपोलकल्पित व अतिरंजीत असे निनावी तक्काररुपी निवेदन समाज माध्यमावर प्रसिध्द केले होते. सदर निवेदनावर मोटार वाहन विभाग (RTO) अधिकारी संघटना, महाराष्ट्र राज्य, असे लिहून आभास निर्माण केला.

या तक्रार अर्जाबाबत मोटार वाहन विभाग संघटनेने दिनांक ५ मार्च, २०२१ रोजी वर्तक नगर पोलीस स्टेशन, ठाणे व पोलीस उपायुक्त (सायबर गुन्हे शोध शाखा) यांचेकडे तक्रार नोंदविली आहे.

(३) व (४) याबाबत चौकशी सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात म्युकरमायकोसिस या बुरशीजन्य आजारावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत

**(८) ९५५९ (१०-०६-२०२१) श्री.रमेश कराड, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.महादेव जानकर, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, डॉ.परिणय फुके, श्री.गोपिचंद पडळकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.संजय दौंड, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.रामराव पाटील, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिकेत तटकरे, श्री.अरुण लाड, श्री.रामदास आंबटकर, श्री.रमेशदादा पाटील, डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोनामुक्त झालेल्या व रेमडेसिविर इंजेक्शन घेतलेल्या व्यक्तींमध्ये म्युकरमायकोसिस या बुरशीजन्य आजाराची लागण झाली असून या आजाराचे २०० हून अधिक रुग्ण आढळून आल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मधुमेही, एड्‌सबाधित, कर्करोगग्रस्त, क्षयरोगी, किडनी विकार रुग्ण, डायलिसिसवर असलेले व आंतर अवयवांचे विकार असणारे तसेच रोगप्रतिकारक शक्ती कमी असणाऱ्या रुग्णांना हा आजार होण्याची शक्यता असून ह्या आजाराचा संसर्ग फुफ्फुसासह मेंदूवर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या आजाराने कल्याण-डोंबिवलीसह बीड, ठाणे व कोल्हापूरमधील एकूण ८ रुग्णांचा मृत्यू झाला असून २ हजार कोरोना रुग्णांना हा आजार झाला असल्याची शक्यता असून या आजाराचे मुंबईत १११, कल्याण-डोंबिवली येथे ६ तर कोल्हापूर येथे ७ संशयित रुग्ण उपचार घेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या आजारावर मिळणारे लिपोसोमल ॲम्फ्रोटेरेसीन इंजेक्शन बाजारात उपलब्ध नसून या औषधाची किंमत रुपये पाच ते दहा हजार असून नागपूर शहरासह राज्यात मेडिकलचे लेखापरिक्षण होत नसल्याने या औषधाचा काळाबाजार होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, म्युकरमायकोसिस या बुरशीजन्य आजाराने मृत्यूमुखी पडलेल्या रुग्णांना रुग्णालयात केंव्हा दाखल केले होते व त्यांचे मृत्यू कधी झाले याबाबतची सविस्तर माहिती काय आहे तसेच, हा आजार महात्मा फुले जन आरोग्य योजनेमध्ये समाविष्ट करण्यात यावा अशी मागणी लोकप्रतिनिधींनी व रुग्णांच्या नातेवाईकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने म्युकरमायकोसिस या बुरशीजन्य आजारावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याच्यादृष्टीने तसेच,औषधांचा काळाबाजार रोखून योग्य यंत्रणेद्वारे औषधे उपलब्ध करुन मेडिकलचे वेळोवेळी लेखापरिक्षण व्हावे याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२९-०६-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) हे खरे नाही, म्युकरमायकोसिस आजारावरील उपचारासाठी वापरण्यात येणारे Inj-Ampheterecin B ५० mg या औषधाची केंद्रशासनाकडून राज्यनिहाय-उत्पादकनिहाय संख्या निश्चित करुन देण्यात येत आहे. राज्यस्तरावरुन त्यानुसार उपलब्ध होणाऱ्या साठ्याची खरेदी करुन राज्यातील आरोग्य संस्थांना पुरवठा केला आहे.

(५) म्युकरमायकोसिस या आजाराची लागण बहुतांशी कोविड रुग्णांमध्ये झाल्याचे दिसून आले आहे. तसेच कोविड रुग्ण रुग्णालयात भरती असतानाच त्यांना म्युकरमायकोसिस या आजाराचे निदान झाल्याने अशा रुग्णांना त्वरित उपचार मिळतात. महाराष्ट्रामध्ये आजपर्यंत ६८७१ इतक्या रुग्णांचे निदान झाले असून त्यापैकी ६०८ रुग्णांचा मृत्यू झालेला आहे.

शासन निर्णय क्र. मफुयो-२०२१/प्र.क्र.१०३/आरोग्य-६, दिनांक १८/०५/२०२१ नुसार म्युकरमायकोसिस हा आजार महात्मा फुले जन आरोग्य योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आलेला आहे.

(६) राज्यातील आरोग्य संस्थांना राज्यस्तरावरुन पुरवठा करण्यात आला असून शासन निर्देशानुसार शासकीय व खाजगी आरोग्य संस्थांमध्ये दाखल म्युकरमायकोसिस रुग्णांना सदरचे इंजेक्शन उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

---

## राज्यात गिधाड संवर्धन केंद्राची निर्मिती करण्याबाबत

**(९) १०४९८ (०५-०१-२०२२) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे : दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २ मधील प्रश्न क्रमांक ६१८८ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने गिधाड प्रजनन केंद्राची गत वर्षी म्हणजे सन २०२० मध्ये घोषणा करुनही अदयाप गिधाड संवर्धनावर कोणतीच ठोस कृती करण्यात आली नसल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गिधाड संवर्धन केंद्र अद्याप प्रलंबित असल्याने वन्यजीव प्रेमींमध्ये प्रचंड नाराजी पसरलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी केंद्र शासनाकडे चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (१८-०६-२०२२) :** (१) व (२) देशातील गिधाड संवर्धनाकरीता कृती आराखडा २०२०-२०२५ तयार करण्यात आला आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्यात नाशिक येथे गिधाड संवर्धन प्रजनन केंद्रासाठी स्थळ निवड व स्थापना करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) महाराष्ट्र राज्यात रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, पुणे, नागपूर, नाशिक व गडचिरोली या जिल्हयांमध्ये गिधाडांचे अस्तित्व आढळते. या क्षेत्रांमध्ये गिधाड संवर्धनाच्या दृष्टीने विविध संस्था जसे की इली फाऊंडेशन सोसायटी, पुणे, नेचर कन्झरवेशन सोसायटी, नाशिक व बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटी, मुंबई यांचेमार्फत संशोधन प्रकल्प राबविण्यात येतात.

यापुर्वी गिधाड संवर्धनाकरीता तयार करण्यात आलेल्या कृती आराखडा, २००६ नुसार राज्यात विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत. त्यापैकी महत्वाचे म्हणजे गिधाड पक्षासाठी धोकादायक असलेल्या डायक्लोफेनेक या पाळीव प्राण्यांसाठी वापरात असलेल्या औषधीवर बंदी घालण्यात आली असून याबाबत राज्यस्तरावर जनजागृती करण्यात आली आहे. या व्यतीरिक्त Vulture Restaurant सारख्या नाविण्यपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून गिधाडांना योग्य खाद्य उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## दौलताबाद (जि.औरंगाबाद) ह्या जागतिक वारसा असलेल्या किल्ल्याभोवतीचे अतिक्रमण हटविण्याबाबत

**(१०) १०६०५ (०६-०१-२०२२) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौलताबाद (जि.औरंगाबाद) ह्या जागतिक वारसा असलेल्या किल्ल्याभोवती अतिक्रमण झाले असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी अतिक्रमण झाल्यामुळे येथे येणाऱ्या पर्यटकांसाठी पार्किंग, शौचालये, तिकिट काऊंटर व प्रकाशन अशा विविध सुविधा उपलब्ध करण्यास अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, सदर ठिकाणी असलेल्या अनधिकृत दुकानदारांकडून ग्रामपंचायत करवसुली करत असल्याचे निदर्शनास आले असून अनधिकृत बांधकामांमुळे विकास कामे करता येत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी / पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने किल्ल्याभोवती असलेली अनधिकृत बांधकामे /दुकाने निष्कासीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (२९-०६-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

दौलताबाद किल्ला, जि.औरंगाबाद हे राष्ट्रीय संरक्षित स्मारक आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

अनधिकृत दुकानदारांकडून स्थानिक ग्रामपंचायत करवसूली करत असल्याने विकास कार्य करण्यास अडचणी निर्माण होत होत्या.

(४) दौलताबाद किल्ला, जि.औरंगाबाद या स्मारकाच्या पार्किंग क्षेत्राजवळ काही गावकऱ्यांनी सन २०२० साली कोविड-१९ या महामारीच्या प्रादुर्भावाने शासनाने लावलेल्या लॉकडॉऊन दरम्यान अतिक्रमण केले होते. भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, औरंगाबाद मंडळ कार्यालयाकडून संबंधितांना नोटीस देण्यात आल्या होत्या. परंतु अतिक्रमणधारकांनी व सरपंच, ग्रामपंचायत औरंगाबाद यांनी भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, औरंगाबाद मंडळाविरुध्द न्यायालयात याचिका दाखल केली. त्यानुसार मा.दिवाणी न्यायालय (वरिष्ठ श्रेणी), औरंगाबाद यांच्या दिनांक २७/०९/२०२१ रोजीच्या आदेशानुसार भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, औरंगाबाद मंडळ व स्थानिक पोलीस प्रशासन यांच्या सहाय्याने स्मारकालगतचे अतिक्रमण काढण्यात आले.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील वातावरण बदलामुळे भविष्यात शेतीवरील परिणामांची आगाऊ इशारा देणारी यंत्रणा गाव पातळीवर सुरु करण्याबाबत

**(११) १०८८४ (०५-०१-२०२२) डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, श्री.मोहनराव कदम** : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनिश्चित पाऊस व हवामान बदलांमुळे उत्तर महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यातील ११ जिल्ह्यांच्या परिक्षेत्रातील शेतकऱ्यांचे नुकसान झाले असून या जिल्ह्यांमधील ७५ टक्क्यांहून अधिक शेती व्यवसाय संकटात असल्याचे भारतीय कृषी संशोधन मंडळ आणि राष्ट्रीय डेअरी संशोधन संस्था यांच्या संशोधनानुसार माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वातावरण बदलामुळे भविष्यात शेतीवरील परिणामांची आगाऊ इशारा देणारी यंत्रणा गाव पातळीवर सुरु करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वातावरण बदलामुळे भविष्यात शेतीवरील परिणामांची आगाऊ इशारा देणारी यंत्रणा गाव पातळीवर सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२९-०६-२०२२) :** (१) भारतीय कृषी संधोधन मंडळ आणि राष्ट्रीय डेअरी संशोधन संस्था या संस्था केंद्र शासनाच्या अखत्यारीतील असून सदर संस्थांचे अहवाल राज्य शासनास प्राप्त झालेले नाहीत.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात कार्यरत शिक्षकांना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या जाचक अटींमुळे पदोन्नतीमध्ये अडचणी येत असल्याबाबत

**(१२) ११३१३ (०५-०१-२०२२) डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात कार्यरत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सहयोगी प्राध्यापकांना प्राध्यापक बनण्यासाठी व पदोन्नतीसाठी असलेल्या वयाच्या तसेच मुलाखत न घेणे अशा अनेक जाचक अटी व शर्तींना सामोरे जावे लागत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२१ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या जाचक अटी व शर्तीमध्ये बदल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (२९-०६-२०२२) :** (१) व (२) हे खरे नाही.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील प्राध्यापक पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार नामनिर्देशनाने भरावयाच्या पदांसाठी वयोमर्यादा ५० वर्षे वयापेक्षा अधिक नाही व जे उमेदवार अगोदरच महाराष्ट्र शासनाच्या सेवेत आहेत, त्यांच्याबाबतीत वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिल करता येईल अशी अट विहित करण्यात आली आहे. अधिसुचित सेवाप्रवेश नियम तसेच भारतीय आयुर्विज्ञान परिषद यांनी वेळोवेळी सुधारीत केलेल्या नियमांच्या तरतुदीनुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत प्राध्यापक पदाची जाहिरात विज्ञापित करण्यात येऊन निवडप्रक्रिया आयोगाच्या कार्यनियमावलीतील तरतुदीनुसार करण्यात येते, सदर पदांवर मुलाखत घेऊनच योग्य उमेदवारांची शिफारस शासनाकडे करण्यात येते. त्याचप्रमाणे प्राध्यापक पदावरील पदोन्नतीसाठी सेवाप्रवेश नियमातील तरतूदीनुसार वयाची मर्यादा तसेच मुलाखतीची आवश्यकता नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, ठाणे तसेच प्रकल्प अधिकारी, पेण यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या आश्रमशाळंमध्ये आर्थिक गैरव्यवहार केल्याबाबत

**(१३) ११८१४ (३०-०३-२०२२) श्री.गोपिचंद पडळकर** : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, ठाणे तसेच प्रकल्प अधिकारी, पेण यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील अनेक शाळांचे चुकीच्या पध्दतीने मूल्यांकन करून नॅशनल पब्लिक स्कूल, पाचगणी या निवासी आश्रम शाळेच्या संगनमताने मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार केला असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून सदर प्रकरणी शासनाची आर्थिक फसवणूक केली असल्याची तक्रार श्री प्रथमेश विलास जगताप (ता.वाई जि.सातारा) यांनी मा.सचिव, आदिवासी विभाग यांना दिनांक १० डिसेंबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, ठाणे व प्रकल्प अधिकारी, पेण तसेच नॅशनल पब्लिक स्कूल निवासी शाळा,पाचगणी यांनी एकूण किती प्रकरणांमध्ये संगनमत करुन गैरव्यवहार केला आहे, तसेच अशा प्रकारच्या एकूण किती तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत,

(३) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने संबंधित अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, ठाणे तसेच प्रकल्प अधिकारी, पेण तसेच नॅशनल पब्लिक स्कूल पाचगणी यांच्या गैरकारभाराची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कार्यवाही केली, वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (२७-०६-२०२२) :** (१) हे खरे नाही.

श्री प्रथमेश विलास जगताप (ता.वाई, जि.सातारा) यांनी मा.सचिव, आदिवासी विभाग यांना दिनांक १० डिसेंबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास कोणत्याही प्रकारची तक्रार दिली असल्याचे आढळून आले नाही.

(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना आहार भत्ता देणे बाबत

**(१४) १२०९७ (३०-०३-२०२२) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अल्पसंख्याक विकास विभागाच्या शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता त्यांच्या आहाराकरीता आर्थिक मदत देण्यात यावी, असे धोरण अल्पसंख्यांक विभागाने घेतले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांना प्रत्यक्षात उक्त लाभ देण्यात येत आहे काय, तसेच, जिल्हानिहाय विद्यार्थी व वाटप निधीबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (१६-०६-२०२२) :** (१) होय.
(२) व (३) आहार भत्याची रक्कम लाभार्थी विद्यार्थ्यांच्या खात्यात थेट लाभ हस्तांतरणाने (Direct Benificiary Transfer (DBT)) जमा करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.

---

## राज्यात विशेषत: पूर्व विदर्भातील वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, नागपूर व गोंदिया जिल्हयात डेग्यू व मलेरियाचे रूग्ण आढळून आल्याबाबत

**(१५) १२४२० (३०-०३-२०२२) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: पूर्व विदर्भातील वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, नागपूर व गोंदिया जिल्ह्यात ८६ टक्के डेंग्यू व मेलेरिया रूग्णांची वाढ होवून ३५९५ डेंग्यू तर १०६९७ मलेरियाचे रूग्ण आढळून आल्याचे दिनांक २९ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर प्रादूर्भाव रोखण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२९-०६-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

- पूर्व विदर्भातील वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, नागपूर व गोंदिया जिल्ह्यात रुग्णसंख्येत वाढ दिसून येत आहे तर डेंग्यू रुग्ण संख्येमध्ये सर्वच जिल्ह्यांमध्ये वाढ दिसून येत आहे तर हिवताप रुग्णसंख्येत गोंदिया, गडचिरोली व नागपूर मध्ये वाढ दिसून येत आहे. तर डेंग्यू रुग्ण संख्येमध्ये सर्वच जिल्हयांमध्ये वाढ दिसून येत आहे.
- हिवताप रुग्णांची वाढ ही गोंदिया, गडचिरोली व नागपुरमध्ये दिसून येत आहे.

(२) डेंग्यू, मलेरिया हा आजार डासापासून होतो. त्यामुळे प्रत्येक जिल्ह्यात डासाच्या प्रतिबंधासाठी खालील उपाययोजना केलेल्या आहेत.-

- आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत नियमित ताप सर्वेक्षण.
- साथरोग उद्रेकाच्या प्रभावी व्यवस्थापनासाठ जिल्हा पातळीवर शीघ्र प्रतिसाद पथके कार्यरत.
- आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत नियमित ताप सर्वेक्षण.
- हिवताप समस्याग्रस्त गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील एकूण ११७१ गावातील ४,६९,६०३ इतक्या लोकसंख्येमध्ये किटकनाशकाची फवारणी करण्यात आलेली आहे.
- नागपूर विभागामध्ये हिवतापाचा प्रादुर्भाव कमी करणेसाठी २,३८,२०० मच्छरदाण्याचे (LLIN) वाटप करण्यात आले.

- १५ हिवताप समस्याग्रस्त प्रा.आ.केंद्रामध्ये गडचिरोली येथे शोध मोहिमेद्वारे २,३६,०७६ लोकांचे रक्तनमुने संकलन करुन त्यामध्ये १६४ हिवताप दूषित रुग्ण आढळून आलेल्या सर्व रुग्णांना समूळ उपचार देणेत आलेला आहे.
- राज्यात डेंग्यू विषाणूजन्य तापाच्या निदानासाठी ४२ सेंटीनल सेंटर्सची स्थापना केली असून राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्था, पुणे येथेही निदानाची व्यवस्था आहे.
- राज्यात गप्पीमासे पैदास केंद्र कार्यरत असून राज्यातील डासोत्पती स्थानांमध्ये गप्पीमासे सोडणे.
- नियमित किटकशास्त्रीय सर्वेक्षण.
- उद्रेकग्रस्त ठिकाणी किटनाशकाची धूरफवारणी.
- शासकीय तसेच खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांचे डेंग्यू, मलेरिया रुग्ण व्यवस्थापन विषयक कार्यशाळेचे आयोजन.
- डेंग्यू, मलेरिया रुग्णांना लक्षणाधारीत उपचार.
- सर्व आरोग्य संस्थाना औषधे व इतर साधन सामुग्रीचा पुरेसा पुरवठा.
- शालेय डेंग्यू जागृती मोहिम.
- उद्रेकगस्त ठिकाणी उपाययोजनांच्या मार्गदर्शनासाठी जिल्हा/ विभागीय/ राज्यस्तरीय अधिकाऱ्यांच्या भेटी.
- विविध माध्यमांद्वारे जनतेस आरोग्य शिक्षण.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्हयातील विशाळगडावरील अतिक्रमणे हटवून गडावरील मंदिरे आणि योद्धांची स्मारके यांचा जीर्णोद्धार करण्याबाबत

**(१६) १२५०५ (३०-०३-२०२२) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील विशाळगड किल्ल्यावरील सर्व अतिक्रमणे तात्काळ हटवून सर्व दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी तसेच गडावरील मंदिरे आणि योद्धांची स्मारके यांचा जीर्णोद्धार करावा अशी मागणी विशाळगड

रक्षण आणि अतिक्रमण विरोधी कृती समिती, कोल्हापूर यांनी शासनाकडे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीवर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे तसेच, निर्णयाचे थोडक्यात स्वरूप काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (२९-०६-२०२२) :** (१) प्रश्नाधीन संस्थेचे अशा स्वरुपाचे दिनांक २३/०३/२०२१ रोजीचे निवेदन सहायक संचालक, पुरातत्व विभाग, पुणे यांचेकडे प्राप्त झाले आहे.
(२) किल्ल्यावरील ४५ अतिक्रमण धारकांना सहायक संचालक, पुरातत्व विभाग, पुणे यांच्याकडून नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. भूमी अभिलेख कार्यालय, शाहूवाडी, तहसिल कार्यालय, शाहूवाडी आणि पुरातत्व विभाग, पुणे यांनी अतिक्रमण झालेल्या क्षेत्राची संयुक्त स्थळ पाहणी केली आहे. या किल्ल्यावर जेसीबी अथवा व इतर यांत्रिक मशिन्स घेवून जाणे शक्य नसल्याने किल्ल्यावरील अतिक्रमित पक्की घरे निष्कासित करण्यास अडचण होत आहे. या किल्ल्यावरील रहिवाशी क्षेत्राचे ड्रोनद्वारे सर्वेक्षण करण्यात आले आहे. तसेच अतिक्रमणबाबत सविस्तर नकाशे व अतिक्रमण निष्कासित करण्यासाठी येणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी वास्तुविशारदाची नियुक्ती करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय व आयुष संचालनालय येथील संचालक पदे भरण्याबाबत

**(१७) १२७०५ (१३-०४-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयातील संचालक पद गत ३५ महिन्यापासून रिक्त असून आयुष संचालनालय येथील संचालक पदही रिक्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात कोरोना व ओमायक्रॉनचा धोका वाढत असतानाही सदरहू पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय व आयुष संचालनालय येथील संचालक पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (२९-०६-२०२२) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
संचालक (वैद्यकीय) व संचालक (आयुष) या पदांचे सेवाप्रवेश नियम सुधारीत करण्याची कार्यवाही सुरू आहे. सद्य:स्थिती, या पदांचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात विद्यार्थ्यांच्या वसतिगृहातील भोजनालये बंद करण्यात आल्याबाबत

**(१८) १२७४० (३०-०३-२०२२) श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कोणतीही मागणी नसतानाही विद्यार्थ्यांच्या वसतिगृहातील भोजनालये बंद करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भोजनालयाचे पैसे थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यासंदर्भात शासनाने डिबीटी योजना लागू केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त योजनेत विद्यार्थ्यांच्या खात्यात वेळेवर पैसे जमा होत नसल्याने या डिबीटी योजनेला विद्यार्थ्यांचा विरोध होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यामुळे शासनाने निर्णय घेवून पूर्वीप्रमाणेच वसतिगृहात भोजनालये सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (२७-०६-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) अंशत: खरे आहे.

शासन निर्णय दिनांक ०५/०४/२०१८ अन्वये राज्यातील "अ", "ब" व "क" वर्ग महानगरपालिका, विभागीय शहरे व जिल्हास्तरावरील असे एकूण १२० शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना आहाराची रक्कम थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येते. उर्वरीत तालुकास्तरावरील तसेच ग्रामीणस्तरावरील वसतिगृहांमध्ये विद्यार्थ्यांना भोजन सुविधा पुरविण्यात येत आहे.
(३) हे खरे नाही.
(४) शासन निर्णय दिनांक १३/०८/२०२० अन्वये शासकीय आश्रमशाळा आणि वसतिगृहांतील विद्यार्थ्यांकरीता कार्यरत थेट लाभ हस्तांतरण धोरणाचा अभ्यास करण्यासाठी श्री.पदमाकर वळवी, माजी मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासगट स्थापन करण्यात आला होता.सदर अभ्यास गटाचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून सदर अहवालावर कार्यवाही विभागामार्फत करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ओबीसी विभागात प्रतिनियुक्तीवर उपसंचालक पद भरण्याबाबत

**(१९) १३१६३ (३०-०३-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने सन २०१८ साली इतर मागास बहुजन कल्याण मंत्रालय स्थापन करून सदर विभागात कामाचे विकेंद्रिकरण करण्याकरीता औरंगाबाद विभागातून लातूर विभागाची वेगळी निर्मिती केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या नवनिर्मित लातूर विभागाकरीता ७ उपसंचालक तसेच पुणे येथील संचालनालयासाठी ३ उपसंचालक पदे प्रतिनियुक्तीवर नेमण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मॅट चे आदेशानुसार एक उपसंचालक पुणे संचालनालयात रूजू झाले असल्याने पुणे संचालनालयात दोन पदे रिक्त असून तेथील संचालनालयात ३ उपसंचालक नेमणुकीच्या प्रस्तावात शासन योग्य ती सुधारणा करून सदर रिक्त पदे भरणार आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने कामाचे विकेंद्रिकरण होण्यासाठी नवनिर्मित ओबीसी विभागांकरीता प्रतिनियुक्ती करुन उपसंचालक पदे भरण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (२९-०६-२०२२) :** (१) इतर मागास बहुजन कल्याण विभागाची निर्मिती दिनांक ०९/०३/२०१७ रोजीच्या अधिसूचनेद्वारे करण्यात आली आहे. प्रशासकीय सोयीसाठी लातूर हा प्रादेशिक विभाग त्या पूर्वीपासूनच अस्तित्वात आहे.
(२) लातूर या प्रादेशिक कार्यालयासाठी ७ उपसंचालकांची पदे मंजूर नसून १ पद मंजूर आहे. उर्वरित पदे कोकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर या ६ प्रादेशिक कार्यालयासाठी प्रत्येकी १ असे असून पुणे येथील संचालनालयासाठी ३ अशी एकूण १० उपसंचालक/प्रादेशिक उपसंचालकांची मंजूर असलेली पदे प्रतिनियुक्तीवर नेमण्याच्या प्रस्ताव विचाराधीन आहे.
(३) इतर मागास बहुजन कल्याण विभागाची सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातून नव्याने निर्मिती झाल्यानंतर या विभागाच्या क्षेत्रिय आस्थापनेवरील नियमित पदभरती होईपर्यंत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांच्यामार्फत या विभागाचे क्षेत्रिय स्तरावरील कामकाज करण्यात येत आहे. संचालनालय, पुणे येथील ३ उपसंचालकांच्या पदांपैकी १ पदावर सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातील उपसंचालक कार्यरत आहेत.
(४) व (५) विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयातील उपसंचालक पदांवर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यासाठी इच्छूकता मागविण्यात आली होती. सामान्य प्रशासन विभागाने मंत्रालय संवर्गातील ३ अवर सचिवांची या विभागाच्या उपसंचालक पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती केली असून उर्वरित पदे भरण्याबाबत तपासून कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## जलालखेडा-मोवाड (ता.नरखेड, जि.नागपूर) मार्गाचे रुंदीकरण व डांबरीकरण करणेबाबत

**(२०) १३४८१ (२०-०५-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलालखेडा-मोवाड (ता.नरखेड, जि.नागपूर) या वर्दळीच्या मार्गाची दूरवस्था झाली असून सदर मार्गावर अपघाताचे प्रमाण वाढले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची तात्पूरती डागडूगी व खड्डे बुजविण्याचे माहे डिसेंबर, २०२१ अखेरीस काम करण्यात आले होते, तथापि, रस्त्यावरील रेती व खडी (गिट्टी) च्या अवैध अवजड वाहतूकीमुळे रस्त्याची पुन्हा दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर मार्गाची तात्पुरती दुरुस्ती करण्याऐवजी मार्गाचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (२७-०६-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) व्दिवार्षिक देखभाल व दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत सदर रस्त्याची आवश्यक देखभाल व दुरुस्तीची कामे करण्यात येऊन सदर रस्ता वाहतुकीकरीता सुस्थितीत करण्यात आला आहे.

(३) सदर रस्त्याचे मजबुतीकरण व सुधारणा करणेचे काम एशियन डेव्हलपमेंट बँकचे अर्थसहाय्यातील प्रकल्पांतर्गत मंजूर आहे. सदर कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करून काम कार्यान्वित करणेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** **श्री.राजेन्द्र भागवत**

**मुंबई.** **प्रधान सचिव,**

**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.